
ISSN 2229-3256

# यशदा यशमंथन

वर्ष ९ वे । अंक ४ था
ऑक्टोबर-डिसेंबर २०१५
मूल्य : रु. २०/-
३ वर्षांची वर्गणी २०० रुपये




राष्ट्रीय कौशल्य विकास उपक्रम

द सिक्रेट ऑफ लाईफ प्रोग्रॅमिंग

प्रशासनात संगणकाचा प्रभावी वापर

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे

ऑक्टोबर-डिसेंबर २०१५
वर्ष ९ वे । अंक चौथा
मूल्य : रु. २०/-

प्रेरणा
आनंद लिमये भाप्रसे
महासंचालक

मार्गदर्शन
डॉ.के.एम.नागरगोजे भाप्रसे
उपमहासंचालक तथा विभागप्रमुख

संपादक
डॉ. बबन जोगदंड
संशोधन अधिकारी (प्रकाशन)

संपादक मंडळ
डॉ. शशिकांत लोखंडे
अतिरिक्त संचालक

सहयोग
व्यंकटेश कल्याणकर
संजीवनी रणदिवे




# यशदा यशमंथन

ISSN 2229-3256

## अ | नु | क्र | म | णि | का

- संवाद... २
- लोकशाहीत्मक प्रशासन आणि जनसहभाग
  प्रा. डॉ. बी. आर. कत्तुरवार ३
- लोकप्रशासनातील गुणवत्ता आणि
  मानव संसाधन विकास: डॉ.वि.ल.धारूरकर ६
- राष्ट्रीय कौशल्य विकास उपक्रम : डॉ. अरविंद कुलकर्णी ९
- मनाची प्रसन्नता, प्रशासनाची उत्तमता : डॉ. विजयकुमार फड १३
- द सिक्रेट ऑफ लाईफ प्रोग्रॅमिंग: डॉ. रेणुका भावसार १६
- स्वत:ला ओळखा, सत्कीर्ती राखून वागा : सुरेश वांदिले १९
- प्रशासनात संगणकाचा प्रभावी वापर : व्यंकटेश कल्याणकर २२
- स्वच्छतेसाठी चाळीस किलोमीटरची पदयात्रा : डॉ. बबन जोगदंड २६
- उपक्रमशील प्रशासक – शेखर गायकवाड: डॉ.बबन जोगदंड २८

यशदा यशमंथनसाठी लेख, वर्गणी, जाहिरातीसाठी पत्ता :
संशोधन अधिकारी (प्रकाशन), यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा),
राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे ४११ ००७. दूरध्वनी : ०२०-२५६०८२२७
ई-मेल : editoryashmanthan@yahoo.in वेबसाइट: http://www.yashada.org

या अंकातील सर्व मते लेखकांची असून त्यांच्याशी
संपादक व 'यशदा' सहमत असेलच असे नाही.



# लोकशाहीत्मक प्रशासन आणि जनसहभाग

प्रा. डॉ. बी. आर. कत्तुरवार

**कोणत्याही देशाचा सर्वांगीण विकास हा सर्वस्वी तेथील शासन व प्रशासन व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असतो. राष्ट्राच्या विकास रथाची दोन चाके म्हणून शासन व प्रशासन या दोन बाबींचा उल्लेख केला जातो. या विकास रथाला गतीशील बनविण्यासाठी त्यात जनतेचा सक्रीय सहभाग अत्यावश्यक असतो. जनतेच्या सहभागाशिवाय झालेला विकास म्हणजे आत्म्यविना शरीर या प्रमाणे असतो. प्रशासन व्यवस्था ही खऱ्या अर्थाने जनतेच्या कल्याणासाठी समाज व राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी अ:हर्निशपणे कार्यरत असते.**

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर भारतासह बहुसंख्य राष्ट्रे गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त झाली. या नव्याने उदयास आलेल्या बहुसंख्य राष्ट्रांनी लोकशाहीत्मक शासन प्रणालीसह कल्याणकारी राज्याच्या (Welfare State) संकल्पनेच्या स्वीकार केला, त्यामुळे शासनाच्या, पर्यायाने प्रशासन व्यवस्थेच्या जबाबदारीत वाढत झाली. जनसामान्यांच्या विविध जीवनावश्यक गरजांची पूर्तता व्हावी, त्यांच्या दैनंदिन समस्या स्थानिक पातळीवरच सोडविण्यात याव्यात, प्रत्येक नागरिकांच्या मनात सुरक्षिततेची भावना दृढ व्हावी आणि परस्पर सहाकार्यातूनच समाजाच्या पर्यायाने राष्ट्राचा सर्वांगीण विकास घडून यावा, लोकप्रशासन आणि जनता यांच्यात सुसंवाद घडून यावा व परस्परांना सहकार्य करण्याची वृत्ती निर्माण व्हावी याच उद्देशाने विविध मंत्रालयात व कार्यालयात स्वतंत्र जनसंपर्क विभाग स्थापन केलेला दिसून येतो. लोककल्याणकारी राज्यात जनतेच्या कल्याणासाठी असंख्य योजना, कार्यक्रम व मोहिमा प्रशासन यंत्रणेमार्फत राबाविल्या जातात. अर्थात कोणतीही योजना असो जोपर्यंत त्या योजनेच्या अंमलबजावणीत जनता समर्पित भावनेने सक्रीयपणे सहभाग नोंदवणार

आजूबाजूचे वातावरण हे तुमच्या बाजूने कायमच अनुकूल असेल,
असा विचार करा आणि आनंदी राहा – ॲन फ्रँक

नाही तोपर्यंत ती योजना शंभर टक्के यशस्वी होऊ शकत नाही.

अर्थात त्यासाठी आवश्यकता असते प्रशासकीय अधिकारी आणि जनता (समाज) यांना जोडणाऱ्या दुव्याची (समन्वयकाची) आपल्या देशात दोन प्रकारचे नेतृत्त्व प्रकर्षाने समाज व राष्ट्रविकासाचे काम करताना दिसून येतात. त्यापैकी एक म्हणजे लोकशाहीत्मक निवडणुकीच्या मार्गाने निवडून आलेले लोकप्रतिनिधी जे प्रशासन व्यवस्थेच्या सर्वोच्च स्थानी असतात. त्यांच्या मार्गदर्शन देखरेख व नियंत्रणाखाली लोकप्रशासन व्यवस्था अंमलबजावणीत्मक कामे करीत असते, तर दुसऱ्या प्रकारचे नेतृत्त्व म्हणजे स्पर्धा परीक्षाच्या माध्यमातून गुणवत्ता सिद्ध करून प्रशासकीय व्यवस्थेत सहभागी झालेले कुशाग्र बुद्धीमत्ता असलेले अधिकारी वर्ग होय.

अधिकारी वर्ग शासनकर्त्यांच्या नियंत्रणाखाली राहून व जनतेचे सहकार्य मिळवून विविध जनहिताची कामे करीत असतो.

प्रशासकीय अधिकारी आणि शासनकर्ते यांच्यात ज्याप्रमाणे सहकार्याची भावना असावी लागते किंबहुना त्याहीपेक्षा अधिक महत्त्वाची बाब म्हणजे अधिकारी आणि जनता( नागरिक) यांच्यात परस्परांना सहकार्य करण्याची वृत्ती मित्रत्वाची भावना व विश्वासपूर्ण संबंध अत्यावश्यक असतात. आज जनता आपल्या हक्कांविषयी अत्यंत जागरूक झाली आहे. विशेषत: ई-प्रशासन, सुशासन, माहितीचा अधिकार नागरिकांची सनद, लोकसेवा हमी कायदा यासारख्या प्रशासकीय सुधारणांमुळे प्रत्येक नागरिक जागरूक बनत आहे. शासन देखील जनतेच्या जवळ आले आहे. परिणाम माय-बाप सरकार अशी याचना करणारा उपेक्षित शोषितांचे प्रतिनिधीत्व करणारा नागरिक इतिहासात (भूतकाळात) जमा झाला आहे. आधुनिक माहिती व तंत्रज्ञानाचा स्वीकार केलेल्या प्रशासकीय व्यवस्थेत लोकशाहीत्मक प्रशासन व्यवस्था बनण्यासाठी व प्रत्येक विकास कामात जनतेचा सहभाग वाढविण्यासाठी खालील उपायांकडे लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे.

### लोकशाही दिन उपक्रम

महाराष्ट्र शासनाने महिन्याचा पहिला सोमवार हा लोकशाही दिन म्हणून तर तिसरा सोमवार महिला लोकशाही दिन म्हणून जनसामान्यांच्या सेवेसाठी राखीव ठेवला आहे. प्रस्तूत दिनी प्रत्येक जिल्हा स्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्त्वाखाली विविध कार्यालयाच्या प्रशासकीय प्रमुखांच्या उपस्थितीत जनतेच्या अडचणी-तक्रारी जाणून घेऊन त्या तात्काळ सोडविण्याचे कार्य केले जाते. अर्थात उपक्रम प्रत्यक्ष लोकशाहीत्मक प्रशासनाचा अविष्कार असून हा उपक्रम गावपातळीवर अगदी शाळा-महाविद्यालय स्तरापर्यंत राबविणे आवश्यक आहे. जनता आणि प्रशासन हे दोन्ही घटक परस्परावलंबी असून त्यांच्यात जितके विश्वासार्ह व मैत्रीपूर्ण संबंध असतील तितकी विकास कामे झापाट्याने यशस्वी होऊ शकतात. त्यासाठी लोकशाही दिनाच्या आयोजनाकडे व त्यातील प्रत्येक निर्णयाच्या अंमलबजावणीकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व्यक्तीश: लक्ष दिले पाहिजे.

### कायदा-नियमांना मानवतावादी किनारा

देशपातळीवर संसद असो किंवा राज्यपातळीवरील विधीमंडळ असो प्रत्यक कायद्याच्या निर्मितीची पार्श्वभूमी अभ्यासली तर जनतेच्या हितासाठी, जनकल्याणाच्याच उद्देशाने प्रत्येक कायदा-नियम- उपनियम तयार करण्यात येतो; परंतु अंमलबजावणी करणाऱ्या प्रशासन व्यवस्थेत अनेक दोष असल्यामुळे कायदा नियमांची मोडतोड करून-विपरित अर्थ काढून किंवा औपचारिक अंमलबजावणी करून स्वार्थ साधला जातो. त्यासाठी प्रत्येक अधिकारी-कर्मचाऱ्यांने कोणतेही काम हाती घेताना प्रथम मी जनतेचा सेवक आहे, जनतेचे हीत जोपासणे, त्यांचे कल्याण साधने हेच माझे आद्यकर्तव्य आहे. याची जाणीव ठेवावी. प्रत्येक कायदा-नियम हा मानवाच्या हितासाठी संरक्षणासाठी आहे, याची जाणीव ठेवून अंमलबजावणी करावी. तरच कायदानिर्मितीची मानवतावादी हेतू साध्य होईल.

### कार्य व्यवस्थापनाबरोबर मन व्यवस्थापनाला महत्त्व

प्रत्येक अधिकारी कार्यालयात बसून वेगवेगळ्या स्वरूपाचे कार्य करीत असतो. अर्थात कार्य करणे आणि मन लावून जाणिवपूर्वक कार्य करणे यात खूप फरक असतो. आपण वेळेचे, पेशाचे, कार्याचे व्यवस्थापन करीत असतो पण अत्यंत संवेदनशील व चंचल असलेल्या मनाच्या व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष करीत असतो. त्यामुळे कार्यातील आनंद, आंतरिक समाधान आणि मानवी संवेदना हळूहळू कमी होत जाते व कार्यालयातील प्रत्येक कृती यंत्रवत बनत जाते. असे म्हटले जाते की, व्यक्तीच्या कामाचे -वर्तनाचे परीक्षण समाज करीत असतो तर मनाचे परीक्षण सृष्टी करीत असते. प्रत्येकाच्या मनातील

उत्सुकता असणे हेच यशापर्यंत पोचण्याचे गमक आहे - केन रॉबिनसन

हालचाल तर सकारात्मक व मानवी हिताला प्राधान्य देणारी असेल तर अधिकारी व जनता संबंध निकोप बनतात. त्यासाठी प्रत्येक अधिकारी-कर्मचाऱ्यांना मानसिक आनंद घेत, संवेदनशील मनाने व सकारात्मक विचाराने आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे.

**ई-प्रशासनाचा उपयोग**

शासन व प्रशासन व्यवस्थेत जनताचा अधिकाधिक सहभाग नोंदवायचा असेल तर प्रत्येक नागरिक आपल्या घरी बसून किंवा व्यवसायात्मक स्वरूपाची कामे करीत प्रशासकीय कामात सहयोग देऊ शकतो.

पेपरलेस ऑफिस व ई-प्रशासन या संकल्पनेचा स्वीकार करून सर्व सामान्य नागरिकांना आपले अर्ज, तक्रारी, सूचना किंवा निवेदने वेबसाईट किंवा ई-मेलच्या माध्यमातून करता येऊ शकतो. अलिकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतातील प्रत्येक नागरिकाला इंटरनेटच्या मदतीने पंतप्रधान व इतर मंत्र्याशी संवाद साधण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तसेच नांदेडच्या जिल्हधिकाऱ्यांनी विशेष टोल फ्री क्रमांकाच्या माध्यमातून व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वेबसाईटवर नागरिकांना ऑनलाईन तक्रार दाखल करण्याची तसेच काही सूचना देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

सारांश, प्रत्येक प्रशासकीय कार्यालयाच्या प्रमुखाने जर स्वत:च्या जीवनशैलीत प्राणिकपणा, शिस्तबद्धता, कर्तव्यदक्षता आणि जनसामान्यविषय जिव्हाळा तसेच सामाजिक बांधिलकीची जाणीव मनात व अंत:करणात ठेवल्यास अशा अधिकाऱ्यांना जनसामान्यात आदराचे स्थान प्राप्त होते. आदर्श अधिकाऱ्यांनी हाती घेतलेल्या प्रत्येक उपक्रमांमध्ये जनता समर्पित भावनेने सहभाग नोंदवते. प्रत्येक अधिकारी-कर्मचाऱ्यांने आत्मपरीक्षण करून कर्तव्य पालन प्रामाणिकपणे (इमानदारीने) केल्यास एक विकसित व महासत्ताक राष्ट्र म्हणून भारताचा उदय होण्यास वेळ लागणार नाही.

**प्रा. डॉ. बी. आर. कत्तुरवार**
लोकप्रशासन विभाग
देगलूर महाविद्यालय देगलूर
जि. नांदेड
संपर्क: ९४२३३ ०५८७०
ई-मेल: brkatturwar@gmail.com

## सरकारी कर्मचाऱ्यांना सुरक्षा प्रदान करण्यासाठी केलेले कायदे

| क्र. | गुन्हा | IPC कायदा कलम | शिक्षा |
|---|---|---|---|
| १. | सरकारी कामात अडथळा आणणे | ३५२ | २ वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा |
| २. | सरकारी कर्मचाऱ्यांशी वाद घालणे | ५०४ | २ वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा |
| ३. | सरकारी कर्मचाऱ्यांस अपशब्द वापरणे | ५०४ | २ वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा |
| ४. | सरकारी कर्मचाऱ्यांस धमकी देणे | ५०६ | ३ ते ७ वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा |
| ५. | सरकारी कर्मचाऱ्यांस मारहाण करणे | ३३२ व ३३३ | ३ ते १० वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा |
| ६. | सरकारी कर्मचाऱ्यांकडून खंडणीची मागणी करणे/ब्लॅकमेल करणे | ३८३, ३८४ व ३८६ | २ ते १० वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा |
| ७. | कार्यालयात जबरदस्ती प्रवेश करणे | ४२७ | २ वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा |
| ८. | सरकारी मालमत्तेस नुकसान पोहोचविणे | ३७८ व ३७९ | ३ वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा |
| ९. | सरकारी दस्तऐवज चोरी करणे | ३७८ व ३७९ | ३ वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा |
| १०. | सरकारी दस्ताऐवजास नुकसान | ३७८ व ३७९ | ३ वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा |
| ११. | अनधिकृत जमाव गोळा करणे | १४१ व १४३ | ६ वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा |
| १२. | सरकारी कार्यालयात गोंधळ घालणे | १४६, १४८ व १५० | ६ वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा |

गुणवत्ता साधण्याचे वातावरण असूनही अनेकजण त्याचा वापर करीत नाहीत - स्टीव्ह जॉब्ज